आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
१० मार्च २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- स्वयंपाक आणि वाहनांसाठी गॅस पुरवठ्याला प्राधान्य देण्याचे केंद्र सरकारचे आदेश, देशभरात एस्मा लागू

- महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल म्हणून जिष्णु देव वर्मा यांचा शपथविधी

- राज्यातल्या ७५ टक्के शेतकऱ्यांना वर्षाखेरपर्यंत अखंड वीज पुरवठा करण्याचं मुख्यमंत्र्यांचं विधानसभेत आश्वासन

- जलजीवन मिशनला डिसेंबर २०२८ पर्यंत मुदतवाढ देण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

**आणि**

- मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यांना आज उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट जारी

**<><><><><><>**

पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे उपलब्ध पुरवठ्याचा वापर करताना स्वयंपाकासाठी सिलिंडर, पाइप गॅस आणि वाहनांसाठीच्या सीएनजीला प्राधान्य देण्याचा आदेश केंद्र सरकारनं जारी केला आहे. साठवणूक आणि काळाबाजार टाळण्यासाठी दोन सिलिंडरमधल्या नोंदणीचा कालावधी २५ दिवसांचा केला आहे. देशातल्या तेल शुद्धिकरण कारखान्यांनी एलपीजी गॅसचं उत्पादन वाढवावं असे आदेश सरकारने दिले आहेत. त्यानंतर खतं, चहा आणि इतर उद्योगांना गॅस पुरवठा केला जाणार आहे.

एलपीजी सिलिंडर साठवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा इशारा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे. एलपीजीच्या पुरवठ्यामध्ये आलेल्या अडचणींमुळे हॉटेल व्यवसायिक संकटात सापडले आहेत. याप्रकरणी अनेक हॉटेल मालकांनी आज राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांची भेट घेतली. एलपीजी पुरवठ्याच्या प्रश्नावर तोडगा निघाला नाही, तर मुंबईतली हॉटेल्स

आणि भोजनालयांना पुढच्या दोन दिवसात कामकाज बंद करावं लागेल असं हॉटेल व्यावसायिकांच्या संघटनेने म्हटलं आहे. पुणे, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, दिल्ली, कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्रप्रदेशातूनही अशाच प्रकारच्या अडचणी येत असल्याचं फेडरेशन ऑफ हॉटेल अँड रेस्टॉरंट असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

पश्चिम आशियातल्या सध्याच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारनं नैसर्गिक वायूच्या उत्पादन, पुरवठा, समतोल वितरण आणि उपलब्धतेचे नियमन करण्यासाठी एस्मा अर्थात आवश्यक वस्तू अधिनियम १९५५ लागू केला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं जारी केलेल्या अधिसूचनेनुसार नैसर्गिक वायूच्या पुरवठ्यासाठी काही क्षेत्रांना प्राधान्य दिलं आहे. यामध्ये CNG, PNG, एलपीजी उत्पादन यांचा समावेश केला आहे.

<><><><><>

महाराष्ट्राचे २२ वे राज्यपाल म्हणून जिष्णु देव वर्मा यांचा शपथविधी आज मुंबईत लोकभवनात झाला. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी त्यांना पदाची शपथ दिली.

शपथविधीनंतर न्यायमूर्ती चंद्रशेखर, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनी राज्यपालांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचं अभिनंदन केलं. यावेळी राज्यपालांना भारतीय नौदलातर्फे मानवंदना देण्यात आली. नवे राज्यपाल जिष्णु देव वर्मा हे साहित्यिक असून, त्यानी पूर्वी त्रिपुरा प्रदेश भाजपाचे सरचिटणीस म्हणून, त्रिपुराचे उपमुख्यमंत्री म्हणून, तसंच तेलंगणाचे राज्यपाल म्हणून काम केलं आहे.

<><><><><>

राज्यातल्या ७५ टक्के शेतकऱ्यांना वर्षअखेरपर्यंत अखंड वीज पुरवठा होईल, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिलं. समाजमाध्यमावर कोणत्याही पुराव्याशिवाय बदनामीचे प्रकार थांबवण्यासाठी काय उपाययोजना करता येतील हे ठरवण्यासाठी पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल. कायद्यात बदल किंवा नवीन तरतुदी करण्याची आवश्यकता आहे का, यासंदर्भात समितीच्या शिफारशीनुसार निर्णय घेऊ असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत सांगितलं. सायबर सुरक्षा जनजागृतीसाठी राज्य सरकारनं ४३ कोटींच्या निधीची तरतूद केली आहे. याशिवाय महा सायबर सेफ ॲप हे ॲप्लिकेशन सुरू केलं जाणार आहे, असं गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

राज्यातल्या प्रलंबित मोजणी प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी महसूल विभागानं 'खासगी परवानाधारक भूमापकांची' नियुक्ती केली आहे. या महिनाअखेरपासून हे भूमापक प्रत्यक्ष काम सुरु करतील, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमधे दिली. यामुळे मोजणीची प्रक्रिया आता केवळ १५ ते ३० दिवसांत पूर्ण होणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><><>**

राज्यावर अकरा लाख कोटींपेक्षा जास्त कर्जाचा बोजा असून राज्य प्रचंड कर्जात बुडत असल्याची टीका जयंत पाटील यांनी केली. अर्थसंकल्पावरील चर्चेत ते आज विधानसभेत बोलत होते. सरकारने ज्या घोषणा केल्या त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूदच नाही, मागणी नसताना मोठमोठे रस्ते बांधण्यात सरकारला रस असून नागरिकांना आवश्यक असणाऱ्या गोष्टी करण्यात नाही अशी टीका त्यांनी

केली. यावेळी पाटील यांनी वेगवेगळ्या योजनांसाठीच्या निधीत केलेल्या कपातीची उदाहरणं सभागृहात सांगितली.

भारत - युरोप करारामुळे इथल्या अल्पभूधारक शेतकऱ्यांना तिथल्या शेतकऱ्यांसोबत स्पर्धा करावी लागेल. यात भारतीय शेतकरी टिकणार नाही असं सांगत पाटील यांनी या कराराला विरोध केला.

सरकार केवळ महामार्ग आणि पूल बांधत आहे, मात्र नागरीक गरिबीत लोटले जात आहेत याला विकास म्हणता येणार नाही असं नाना पटोले म्हणाले. सरकार केवळ घोषणा करत असून त्याची अंमलबजावणी होत नाही, अशी टीका त्यांनी केली.

महाराष्ट्राचं स्थूल राज्यांअंतर्गत उत्पादन देशात सर्वात जास्त आहे. पण केवळ जीडीपी वाढणं म्हणजे विकास नाही, असं निलेश राणे या चर्चेदरम्यान म्हणाले. महसुली आणि राजकोषीय तूट कशी भरून काढणार हा राज्यापुढचा प्रश्न आहे. कर भरण्यात महाराष्ट्र आघाडीवर आहे मात्र केंद्राकडून परतावा मिळत नाही, असं राणे म्हणाले.

शेती आणि ग्रामविकासाला अर्थसंकल्पात मोठं स्थान दिलं असून पायाभूत सुविधांना महत्त्व दिलं आहे असं विनय कोरे म्हणाले. राज्यात विषम विकास झाला आहे, सेवा क्षेत्राची वाढ झाली मात्र उद्योग आणि शेती क्षेत्राचा विकास झाला नाही. हा समतोल साधल्यशिवाय पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचं उद्दिष्ट गाठता येणार नाही असं कोरे म्हणाले.

**<><><><><>**

मुंबई महानगरपालिका क्षेत्रातल्या शासकीय महिला कर्मचारी 'Come Early, Go Early' या संकल्पनेनुसार सकाळी सव्वा 9 ते पावणे दहा या कालावधीत कार्यालयात लवकर येऊन जितकी मिनिटं काम करतील, तितकी मिनिटं लवकर कार्यालयातून निघण्याची, म्हणजे 30 मिनिटांची सवलत देण्याचा निर्णय सरकारनं

घेतल्याची घोषणा उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी आज विधानपरिषदेत केली. या निर्णयामुळे गर्दीच्या वेळी होणारी महिलांची गैरसोय कमी व्हायला मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने सभागृहात झालेल्या चर्चेला त्या उत्तर देत होत्या. या चर्चेदरम्यान सर्व सदस्यांनी मांडलेल्या सूचनांचा सकारात्मक विचार सरकार करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

<><><><><>

केंद्रीय मंत्रीमंडळानं जल जीवन मिशनला डिसेंबर २०२८ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदीयांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत झालेल्या बैठकीत हा निर्णय झाल्याची माहिती केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. यासाठी ८ लाख ६९ हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून त्यातला ३ लाख ५९ हजार कोटी रुपयांचा निधी केंद्र सरकार देणार आहे.

तामिळनाडूतल्या मदुराई विमानतळाला आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याचा निर्णयही केंद्रीय मंत्रीमंडळानं आज घेतला. याशिवाय इतरही काही महत्त्वाचे निर्णय केंद्रीय मंत्रीमंडळाच्या आजच्या बैठकीत झाले.

दरम्यान रेल्वे मंत्रालयानं मुंबई - बडोदा दरम्यान १ हजार किलोमीटर ऑप्टिकल फायबर टाकायला मंजुरी दिली. यामुळं अपघातविरोधी कवच तंत्रज्ञान राबवता येणार आहे.

**<><><><><>**

दोन सत्रातल्या जोरदार घसरणीनंतर देशातल्या शेअर बाजारात आज चांगली तेजी झाली. जागतिक बाजारात झालेली वाढ, घसरलेल्या कच्च्या तेलाच्या किंमती यामुळं ही तेजी दिसून आली. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी युद्ध लवकर संपवण्याचे संकेत दिल्याचाही परिणाम बाजारावर झाला. सेन्सेक्स ६४० अंकांनी वधारुन ७८ हजार २०६ अंकांवर बंद झाला. निफ्टी २३४ अंकांची वाढ नोंदवून २४ हजार २६२ अंकांवर बंद झाला.

सोनं आणि चांदीच्या किंमतीही आज वधारल्या. सोनं दीड हजार रुपयांनी महाग झाल्यानं एक तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ६१ हजार रुपये मोजावे लागत होते. चांदी सुमारे ११ हजार रुपयांनी महाग झाल्यानं एक किलो चांदीचे दर २ लाख ७९ हजार रुपयांच्या पलीकडे गेले होते.

**<><><><><><>**

अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत राज्य सरकारने प्रस्ताव पाठवूनही सीबीआय चौकशी सुरू झाली नसल्याचा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे. सुशांत सिंग राजपूत याच्या आत्महत्या प्रकरणात बिहार सरकारने विनंती केल्यावर दोन दिवसात सीबीआय चौकशी सुरू करण्यात आली होती, याकडे त्यांनी लक्ष वेधलं. या प्रकरणी रोहित पवार यांनी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी, अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांचीही त्यांनी नवी दिल्ली इथे भेट घेतली.

**<><><><><><>**

देशात समान नागरी कायदा लागू करण्याची वेळ आता आली आहे, असं मत आज सर्वोच्च न्यायालयानं व्यक्त केलं. शरियत कायद्यातल्या तरतुदी मुस्लिम महिलांसाठी भेदभाव निर्माण करणाऱ्या असल्यानं त्या रद्द करण्याची मागणी करणाऱ्या याचिकेवर आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली त्यावेळी सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालच्या पीठानं हे मत व्यक्त केलं. न्यायालयानं शरियत कायदा रद्द केला तर कायदेशीर पोकळी निर्माण होईल, असं त्यांनी नमूद केलं.

**<><><><><><>**

मुंबई, ठाणे आणि पालघर जिल्ह्याला आज उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. रायगड जिल्ह्याला उष्णतेच्या लाटेचा यलो अलर्ट असल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे. या चारही जिल्ह्यांना उद्यासाठी उष्णतेचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर अकोला आणि अमरावती जिल्ह्यांनाही उद्यापर्यंत यलो अलर्ट दिला आहे. येत्या काही दिवसांत विदर्भातही उष्णतेची लाट येण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

//<><><><><><>//